नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी
निशाणी क्र. १३



**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ सचिन गोवर्धन आठवले यांचा सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. टी. एस. आरगे यांच्यामार्फत शपथेवर सुरू.</u>**

**६.** त्यांनी ज्या व्यक्तिंना रानडुकराचे मास विकले त्यामध्ये क्षेदिराम ठाकूर, रा. सर्रा, ता. सावनेर याचे नाव सांगितले. आम्ही माहिती काढली की, तो सर्रा येथील विट भट्टीवर काम करत होता. त्याने १४ मार्च रोजी पंढरी कुंभरे व उत्तर मेश्राम यांच्याकडून मास विकत घेतले का असे विचारले असता त्याने मास विकत घेतल्याची कबूली दिली. त्या आधारे त्याला अटक करण्यात आली. त्याप्रमाणे त्याचे बयाण नोंदवले. इतर आरोपींना सर्रा येथे नेवून विट भट्टी दाखवली व तेथे त्यांनी क्षेदिराम ठाकूर यांना मास विकल्याचे कबूल केले. त्याप्रमाणे मेमोरेंडम पंचनामा तयार केला. तो मला दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २७** देण्यात येते. आरोपी क्र. ५ व ६ यांचे बयाण नोंदवले व २३ मार्च रोजी आरोपींना त्यांची घर झडतीकरिता तोरणी, ता. बिछवा, जि. छिंदवाडा, राज्य मध्य प्रदेश येथे घेवून गेलो. फरार आरोपी वसंता बन व संजय सिलू यांच्या तपास केला. ते आढळले नाही. राजू दरसमा व माणिक याच्या घराची झडती घेतली. त्याप्रमाणे मेमोरेंडम पंचनामा केला. तो मला दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २८** देण्यात येते. घराच्या झडतीमध्ये माणिक सिलू याच्या घरी इलेक्ट्रीक प्लास्टीक कोटेड वायर मिळून आल्याने ती जप्त केली. त्याप्रमाणे जप्ती पंचनामा केला. त्यावर वर्तुळ अधिकारी राऊत यांची सही आहे. त्यानंतर आरोपींना खापा येथे आणून न्यायालयासमक्ष हजर केले.

**७.** त्यानंतर फरार आरोपींचा शोध घेण्यात आला. आरोपींविरुध पुरावा निष्पन्न झाल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. ते

विडीयो कॉन्फरंसीद्वारे न्यायालयात हजर आहेत. जप्त मोटर सायकल न्यायालयात जागेची कमतरता असल्याने खापा फॉरेस्ट ऑफिसच्या ताब्यात आहे. ती मी हजर करू शकतो.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ४ ते ६ तर्फे वकील श्रीमती. जे. एच. शेंडे यांचेमार्फत</u>**

**८.** मला महाराष्ट्राच्या जी. आर. प्रमाणे तपासाचे अधिकार प्राप्त आहे. मी सदरचा जी.आर. प्रकरणामध्ये लावला आहे. प्रधान मुख्य वन संरक्षक यांनी माझी नेमणुक केली. ते पत्र मी दाखल केले आहे. त्याची तारीख मला आता सांगता येणार नाही.

**९.** १ वर्ष वयाच्या वाघाची लांबी साधारण एक ते दिड मिटर असते. त्याची उंची मी सांगू शकत नाही. सदर प्रकरणातील वाघ तीन ते चार वर्षाचा होता. त्याची लांबी व उंची मी पाहून सांगू शकतो. एक वर्षाच्या वाघाला किती दात असतात हे मी सांगू शकत नाही. तीन ते चार वर्षाच्या वाघाला २० दात असतात. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणातील वाघाचे दात मी मोजले नाही. सदर प्रकरणातील वाघाच्या मिशा काढलेल्या होत्या. तीन ते चार वर्षाच्या वाघाला किती मिशा असतात हे मी निश्चित सांगू शकत नाही. वाघाच्या चार पंजांना प्रत्येक पंजाला चार नख असतात. सुळे दात पकडून २० दात वाघाला असतात.

**आरोपी क्र. ४ ते ६ तर्फे वकीलांच्या तोंडी विनंती वरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2025.10.16 16:38:06 +0530

सावनेर,
दिनांक १६.१०.२०२५

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी
निशाणी क्र. १३

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe